# " शेतकरी आत्मसन्मान "

# प्रतिज्ञा

आम्ही वर्धा जिल्ह्यातील विद्यार्थी अशी प्रतिज्ञा करतो की, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही सारे कटीबध्द आहोत. शासनाच्या शेतकऱ्यांच्या संबंधीच्या विविध योजनांचा व शेतकरी पॅकेजचा अभ्यास करुन, त्यातील सवलतींची माहिती शेतकऱ्यांना मिळवून देण्याचा आम्ही प्रयत्न करु.

आम्ही प्रतिज्ञा करतो की, खोट्या प्रतिष्ठेसाठी कर्ज काढून विवाहासारखे प्रसंग खर्चिकतेने साजरे करणार नाही. सामुहिक विवाहाअंतर्गत मुलामुलींचे लग्न करण्याचा आग्रह धरु. लग्नाचे वेळी हुंडा देणार व घेणारही नाही, याबाबत आग्रह धरु. व्यसनाधिनते पासून लोकांना परावृत्त करु.

आपल्या घरी, शेजारी व गावात कोणीही आत्महत्या करणार नाही याची काळजी घेवू. आत्महत्या केल्याने कोणतेही प्रश्न सुटत नाहीत, हे आम्ही पालकांना पटवून देवू. शेतकऱ्यांच्या सन्मानातच देशाचा मान आहे. आम्ही शेतकऱ्यांचे पाल्य आहोत याचा आम्हाला अभिमान आहे.

**जयहिन्द !**